**प्रस्तावना**

राज्यात विकासाभिमुख सरकार स्थापन होऊन अडीच वर्षांचा कालावधी झाला आहे. या काळातील राज्याला प्रगतिपथावर नेणारा तिसरा अर्थसंकल्प आज मी महाराष्ट्राच्या १२ कोटी जनतेच्या साक्षीने सादर करीत आहे.

महाराष्ट्राचा मानबिंदू असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मुंबईलगतच्या अरबी समुद्रात स्मारक उभारण्याच्या प्रकल्पाचे जल व भूमिपूजन मा. पंतप्रधान, भारत सरकार यांच्या हस्ते दिनांक २४ डिसेंबर २०१६ रोजी संपन्न झाले आहे.

सरकारने विविध क्षेत्रांमध्ये भरीव आणि कल्याणकारी वाटचाल केली आहे. शासनाच्या अर्थसंकल्पाचा केंद्रबिंदू हा नेहमीच दीन, दुर्बल, शोषित, पीडित हा राहिला आहे. सिंचनाच्या तसेच कृषी क्षेत्रामध्ये नवीन योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे यासाठी शासन कटीबद्ध आहे. जलयुक्त शिवार योजना, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, प्रधानमंत्री पीक विमा योजना यासारख्या योजना राबविल्या आहेत. उद्योग क्षेत्रामध्ये महाराष्ट्र हे एक अग्रेसर राज्य आहे. उद्योग क्षेत्राला चालना देण्यासाठी नवीन धोरणे हाती घेतली आहेत. महाराष्ट्रातील शालेय शिक्षणाचा तसेच उच्च व तंत्र शिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी अनेक अभिनव उपक्रम हाती घेतले गेले आहेत. स्मार्ट सिटी, मुंबई, पुणे, नागपूर मेट्रो, मिहान प्रकल्प याद्वारे नागरी विकास साधला जात आहे. सेवा हमी कायदा, माहिती अधिकार कायदा यासारखे कायदे ऑनलाईन केले जात असून सामान्य माणसाला सहज शासकीय सेवा प्राप्त व्हावी हा या योजनांचा उद्देश आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षातील राज्य सरकारच्या कामगिरीमुळे सन २०१४ साली असलेला ५.४ महाराष्ट्राचा विकासदर सन २०१६-१७ मध्ये ९.४ पर्यंत पोहचला आहे. महाराष्ट्राचा विकास दर पुढच्या वर्षी दोन अंकी करण्याचा आमचा संकल्प आहे. देशाच्या सरासरी विकासदरापेक्षा तसेच अन्य आघाडीच्या राज्यांच्या तुलनेत निश्चितपणे मोठी झेप घेतली आहे.

## कृषी व संलग्न क्षेत्रे

भारत हा कृषीप्रधान देश आहे हे आम्ही नेहमीच गौरवाने म्हणत आलो आणि ते खरंही आहे. अन्नदाता सुखीभव असे आपल्या समाजात म्हटले जाते. पण आज शेतकऱ्यांच्या प्रतिकूल परिस्थितीची शासन म्हणून मला चिंता आहे. जगाचा पोशिंदा हा स्वतःच जर संकटात असेल तर कृषीक्षेत्रातील समस्या सोडविणे ही शासनाची जबाबदारी आहे. महाराष्ट्रातील ५० टक्क्यांपेक्षा जास्त लोकसंख्या कृषी क्षेत्रात गुंतलेली असताना कृषी क्षेत्राचा राज्याच्या उत्पन्नातील वाटा फक्त १०.५ टक्के इतकाच आहे. त्यातील महत्त्वाची बाब म्हणजे कमी उत्पादकता. या कमी उत्पादकतेच्या मुळाशी असणारी कारणे म्हणजे अवर्षण, दुष्काळ, पाण्याची टंचाई. योग्य दळणवळणांच्या साधनांचा अभाव, नव्या तंत्रज्ञानाचा पुरेसा वापर नसणे आणि महत्त्वाचे म्हणजे योग्यवेळी आवश्यक तितका पतपुरवठा उपलब्ध न होणे. त्यामुळे शेतकरी आज मदत आणि पुनर्वसन या दुष्टचक्रात फसला जात आहे. या परिस्थितीवर मात करुन त्याला मुळातच सक्षम करणे, शेतकरी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत शेतीला गुंतवणुकीचे क्षेत्र बनवून सन २०२१ पर्यंत शेतकऱ्यांच्या उत्पन्नात दुप्पट वाढ करण्याचा सरकारचा संकल्प आहे.

या धोरणाला अनुसरुन या अर्थसंकल्पात शेतकरी हिताच्या खालील योजना मी जाहीर करीत आहे.

जलसंपदा

१. मी मागील दोन अर्थसंकल्पात घोषित केल्यानुसार जलसंपदा विभागास प्रस्तावित केलेल्या निधीचे १०० टक्के वितरण करण्यात आले आहे. सन २०१७-१८ मध्ये जलसंपदा विभागास ८ हजार २३३ कोटी रुपये एवढी भरीव तरतूद करण्यात आली आहे.

२. प्रधानमंत्री कृषी सिंचाई योजनेंतर्गत महाराष्ट्रातील २६ प्रकल्पांचा समावेश आहे. सन २०१७-१८ मध्ये या प्रकल्पांद्वारे सुमारे ८२ हजार ६०० हेक्टर सिंचन क्षमता निर्माण होणार असून, यासाठी सन २०१७-१८ मध्ये २ हजार ८१२ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच सदर प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर जवळपास ५ लाख ५६ हजार हेक्टर एवढी अतिरिक्त सिंचन क्षमता निर्माण होईल.

३. मराठवाड्यातील अवर्षण प्रवण उस्मानाबाद व बीड जिल्ह्यास वरदान ठरणाऱ्या कृष्णा-मराठवाडा प्रकल्पाचा ७ अब्ज घन फूट पाणी वाटपाचा पहिला टप्पा आगामी ४ वर्षात पूर्ण करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. मा. राज्यपाल महोदयांच्या सूत्रानुसार मराठवाड्यास उपलब्ध होणाऱ्या निधीतून या प्रकल्पास पुरेसा निधी उपलब्ध होत नसल्याने, मा. राज्यपाल महोदयांचे अनुमतीने या प्रकल्पासाठी २५० कोटी रुपयांची विशेष तरतूद निधी वाटपाचे सूत्राबाहेर ठेवली आहे. या योजनेद्वारे उस्मानाबाद जिल्ह्यातील २५ हजार ७९८ हेक्टर तसेच बीड जिल्ह्यातील ८ हजार १४७ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ मिळणार आहे. त्याचप्रमाणे ९ तालुक्यातील २८८ गावांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न सुटणार आहे.

**जलयुक्त शिवार**

४. जलयुक्त शिवार हा राज्य शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प असून त्याद्वारे राज्याच्या दुष्काळावर कायमस्वरुपी उपाययोजना करण्यात येत आहे. या योजनेतून दर वर्षी ५ हजार गावे टंचाईमुक्त करण्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. या अभियानासाठी राज्य सरकारकडून आतापर्यंत १ हजार ६०० कोटी रुपये निधी वितरित करण्यात आला असून लोकसहभागातून २४६ कोटी रुपयांची कामे करण्यात आली आहेत. सन २०१७-१८ मध्ये एकूण १ हजार २०० कोटी रुपये निधी प्रस्तावित करण्यात आला आहे. याव्यतिरिक्त या अभियानासाठी केंद्र शासन तसेच जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातूनही निधी उपलब्ध केला जाईल.

**विहिरी व शेततळी**

५. राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सन २०१०-११ पासून आतापर्यंत १ लाख २२ हजार ५६२ विहिरी पूर्ण करण्यात आले आहेत. त्यापैकी गेल्या दोन वर्षात शासनाच्या विशेष प्रयत्नामुळे ५९ हजार ३४८ विहिरी पूर्ण करण्यात आल्या आहेत. याचबरोबर विहिरी, मागेल त्याला शेततळे या कार्यक्रमांकरिता २२५ कोटी रुपये तरतूद उपलब्ध करण्यात आली असून, या कार्यक्रमाकरिता निधी कमी पडू दिला जाणार नाही.

**सूक्ष्म सिंचन**

६. राज्यामध्ये जास्तीत जास्त सिंचन हे सूक्ष्म सिंचनाद्वारे करण्याचे राज्याचे धोरण असून, त्याअंतर्गत इस्त्रायली तंत्रज्ञानाचा अवलंब करुन वर्धा जिल्ह्यातील आर्वी व मौजे बेंबाळ तालुका बाभूळगाव जिल्हा यवतमाळ येथील उपसा सिंचन योजना पूर्णतः स्वयंचलित सूक्ष्म सिंचन पद्धतीचा अवलंब करुन राबविण्यात येणार आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये १०० कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

७. सूक्ष्म सिंचन पद्धतीचा वापर केल्यास पाणी वापरामध्ये ३० ते ४० टक्के एवढी बचत होते. या पध्दतीनुसार पाण्याची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता असणारे ऊस पिकाखालील क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आणावे या हेतूने शेतकऱ्यांना सूक्ष्म सिंचनासाठी सवलतीच्या दराने कर्ज उपलब्ध करुन देण्याची योजना प्रस्तावित आहे.

कृषिपंप ८. कृषिपंप जोडणी व विद्युत पायाभूत सुविधा अंतर्गत पूर्व विदर्भातील नागपूर, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली व वर्धा या जिल्ह्यांकरिता तसेच राज्यात कृषिपंपांचा उर्वरित प्रादेशिक अनुशेष दूर करण्याकरिता आणि पायाभूत आराखडा-२ योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण ९७९ कोटी १० लाख रुपये एवढा निधी प्रस्तावित आहे.

व्याज सवलत ९. डॉ. पंजाबराव देशमुख व्याज सवलत योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये १२५ कोटी ६४ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

विपणन १०. शेतकऱ्यांच्या शेतमालाला योग्य भाव मिळण्यासाठी व शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्यासाठी पणन विभागामार्फत राज्यात शेतमालाच्या साठवणुकीसाठी गोदाम व्यवस्थेमध्ये सुधारणा करणे, शेतमालाच्या प्रतवारीमध्ये वाढ होण्यासाठी विकेंद्रीत रितीने व्यवस्था उपलब्ध करणे, शेतमाल विक्री व्यवस्थेमध्ये स्पर्धा निर्माण करण्यासाठी थेट पणन व खाजगी बाजार यांना चालना देण्यासाठी प्रचार व प्रसिध्दी योजना, राज्यातील १० ठिकाणी ॲग्रो मार्केट उभारणे, संत शिरोमणी सावता माळी आठवडे बाजार अभियान योजनेची व्याप्ती वाढविण्यासाठी पावले उचलणे व शेतकऱ्यांचा शेतमाल तारण ठेवून शेतकऱ्यांना तातडीने कमी व्याजदराने सुलभ कर्ज मिळविण्यासाठी योजनेची व्याप्ती वाढवणे या सर्वांसाठी ५० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

कोल्ड व्हॅन योजना ११. कृषी उत्पन्न बाजार समित्यांचे कृषी विपणनावरील नियंत्रण उठवल्यामुळे कृषी माल विक्रीसाठी बाजारपेठ मुक्त झाली आहे. याचा फायदा कृषी उत्पादन कंपन्यांना व्हावा व शेतमालाची वाहतूक सुकर व्हावी यासाठी कोल्ड व्हॅन देण्याची नवीन योजना घोषित करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**काजू प्रक्रिया** कोकणातील सिंधुदूर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे व पालघर या जिल्ह्यामध्ये काजू लागवडीचा, त्यावरील प्रक्रियेचा तसेच काजू बोंडावरील प्रक्रियेचा कार्यक्रम राबविण्यात येणार असून, यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**गट शेती योजना** १२. कृषिक्षेत्राचे उत्पन्न सन २०२१ पर्यंत दुप्पट करण्याचा शासनाचा मानस असून त्याकरीता सिंचन, ऊर्जा, शेत रस्ते, कृषिप्रक्रिया उद्योग, कृषि तंत्रज्ञान, विपणन, समुह शेती, कृषि पतपुरवठा यावर लक्ष केंद्रित करून विशेष योजना कार्यान्वित करण्याचे शासनाने ठरविले आहे. यासाठी राज्यात मोठ्या प्रमाणात शेतकरी उत्पादक कंपन्या व शेतकरी गट स्थापन करण्यात येतील. हे गट पूर्ण कार्यक्षमतेने कार्यरत होण्यासाठी निवडक गावांमध्ये ही योजना राबविण्यात येईल. या योजनेमध्ये किमान २० शेतकऱ्यांचा एक गट व त्यांच्या किमान १०० एकर शेतजमिनीचा समावेश असेल. परंतु या गटामध्ये कोणत्याही शेतकऱ्याची जमीन १० एकरपेक्षा अधिक असणार नाही. असे शेतकरी गट व शेतकरी उत्पादक कंपन्या यांच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येईल. या योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये २०० कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात येत आहे. हा पथदर्शी प्रकल्प यशस्वी झाल्यास त्याची पूर्ण राज्यात अंमलबजावणी करण्यात येईल.

१३. जागतिक तापमानवाढ व हवामानबदल यापासून शेती सुरक्षित करण्यासाठी मराठवाड्यातील ४ हजार गावातील शेतीस दुष्काळापासून संरक्षित करण्यासाठी तसेच विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील १ हजार गावामधील क्षारतेच्या समस्येवर मात करण्यासाठी जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने सुमारे ४ हजार कोटी रुपयांचा " नानाजी देशमुख कृषी संजीवनी " प्रकल्प सुरु करण्यात येणार आहे.

१४. अनुसूचित जाती आणि नवबौद्ध शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवून त्यांना आर्थिक स्थैर्य देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावंलबन योजनेसारखी योजना अनुसूचित जमातीच्या शेतकऱ्यांसाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून राबविण्यात येईल. याकरिता ९२ कोटी रुपये एवढी तरतूद उपलब्ध करण्यात आली आहे.

१५. महाराष्ट्र राज्यात आतापर्यंत सुमारे ८० लाख शेतकऱ्यांना मृदा आरोग्य पत्रिकांचे वाटप करण्यात आले असून सन २०२१ पर्यंत उर्वरित सर्व शेतकऱ्यांना वाटप करण्याचा शासनाचा मानस आहे.

कृषि शिक्षणाला चालना देण्यासाठी यवतमाळ, नाशिक व पेठ, जिल्हा सांगली येथे शासकिय कृषि महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

शेतकरी कर्जमुक्ती

१६. शेतकरी कर्जमुक्त व्हावा याकरिता राज्य शासन कटीबध्द आहे.

राज्यातील १ कोटी ३६ लक्ष ४२ हजार खातेदार शेतकऱ्यांपैकी ३१ लक्ष ५७ हजार शेतकरी थकीत कर्जामुळे संस्थात्मक कर्जव्यवस्थेतून बाहेर जाण्याचा धोका निर्माण झालेला आहे. या शेतकऱ्यांना पीक कर्ज मिळायचे असेल तर त्याचे थकीत कर्ज फेडावे लागेल व त्यांच्या ७/१२ वरील बोजा संपावावा लागेल हे कर्ज सुमारे ३० हजार ५०० कोटीपर्यंत आहे.

राज्य शासनाने शेतकरी कर्जमुक्त व्हावा म्हणून शेती क्षेत्रात गुंतवणूक वाढविली आहे. राज्याच्या अर्थव्यवस्थेत संपूर्ण कर्ज फेडायचे ठरवले तर कृषी क्षेत्रातील गुंतवणुकीवर त्याचा परिणाम होईल व शाश्वत शेती व्यवस्था न झाल्याने शेतकरी पुन:श्च कर्जबाजारी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

याकरिता राज्य शासनाने केंद्र शासनाला मदतीची विनंती केली आहे. तसेच केंद्र शासनाला हेही स्पष्टपणे नमूद केले आहे की, यामध्ये राज्य शासनदेखील सहभागी होऊन आपला वाटा उचलण्यास पूर्णपणे तयार आहे व तशी तजवीजही करण्यात येईल.

या थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे राहील. मात्र जे ७० टक्के शेतकरी नियमित कर्ज भरत आहेत त्यांनाही माझे आवाहन आहे की, वरील योजना ही केवळ जुन्या थकीत कर्जाकरिता असणार आहे. त्यामुळे आपल्यालाही त्याचा फायदा मिळेल असा विचार करून कर्ज थकविण्याचा किंवा न भरण्याचा निर्णय त्यांनी घेऊ नये. त्याचे दुरगामी परिणाम बँकावर व शेती क्षेत्रावर होईल व हे क्षेत्र उद्‌ध्वस्त होईल. मात्र मी आश्वासित करतो की, थकीत कर्जदारांकरिता योजना करतांना नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना लाभ होईल अशी योजनाही राज्य शासन घोषित करेल.

## युवा, कौशल्य विकास व रोजगार

आज महाराष्ट्रात अठरा ते तीस या वयोगटातील २५ टक्के इतके तरुण आहेत. या तरुण हातांना उत्तुंग उभारी देत विधायक कार्याकडे वळवायचे असेल तर त्यांना नवनव्या तंत्रज्ञानाने प्रशिक्षित करत रोजगार उपलब्ध करून देणे अत्यावश्यक आहे. युवकांच्या शक्तीचा योग्य वापर करून त्यांना रोजगारक्षम करण्यासाठी या

अर्थसंकल्पात मी खालील योजना जाहीर करतो. राज्याच्या विकासामध्ये तरुणाईचा मोठा सहभाग असतो. त्यामुळे या कल्पक युवा शक्तीचा यथोचित वापर करुन प्रत्येक हाताला काम उपलब्ध व्हावे यासाठी विविध क्षेत्रातील रोजगार निर्मितीस चालना देण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

**प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान**

१७. युवा सक्षम तर देश सक्षम या धोरणाला अनुसरुन राज्यातील १५ ते ४५ वयोगटातील युवक-युवतींचे कौशल्य विकास प्रशिक्षणाद्धारे सक्षमीकरण करून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराचे प्रशस्त दालन उपलब्ध करून देण्यासाठी "प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास" अभियानांतर्गत विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्यासाठी सुमारे १ हजार ९७० प्रशिक्षण संस्थाना सूचिबध्द केले असून त्यांच्यामार्फत १ लाख २२ हजार गरजू युवकांना रोजगार व स्वंयरोजगाराचा लाभ मिळण्याच्या दृष्टीने प्रशिक्षण कार्यक्रमास सुरुवात करण्यात आली आहे, यामध्ये ५७ टक्के महिलांचा समावेश आहे.

१८. सदर अभियानांतर्गत विविध ३५ उद्योग समूहांबरोबर सामंजस्य करार करण्यात आले असून, त्यापैकी २८ सामंजस्य करार कार्यान्वित झाले आहेत. या माध्यमातून पुढील तीन वर्षात ७ लाख उमेदवारांना कौशल्य प्रशिक्षण देण्यात आले आहे. तसेच या अभियानांतर्गत औद्योगिक प्रशिक्षण संस्थांचे आधुनिकीकरण करण्यात येत आहे. सदर अभियानासाठी सन २०१७-१८ मध्ये ९९ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यासाठी मागणीनुसार आवश्यक निधी उपलब्ध करून दिला जाईल.

१९. ग्रामीण भागातील घरकुल बांधकामास कुशल गवंडी उपलब्ध होण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये सुमारे १० हजार गवंडी कारागीरांना प्रशिक्षित करण्याचे काम सुरु झाले आहे. जेणेकरुन घरकुलांच्या दर्जात्मक बांधकामाबरोबरच विहित मुदतीत घरकुलांचे बांधकाम करणे शक्य होईल व त्यांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल.

२०. ग्रामीण कौशल्य योजना या केंद्र पुरस्कृत योजनेंतर्गत ग्रामीण भागातील १५ ते ३५ वयोगटातील युवकांची मूळात असलेल्या कौशल्याची कार्यक्षमता वाढवून त्यांना विविध संघटित क्षेत्रात वेतनी रोजगार उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सन २०१७-१८ या वर्षामध्ये एकूण २१ हजार ५९७ लाभार्थींना प्रशिक्षण

देऊन वेतनी रोजगार उपलब्ध करून देण्याचे नियोजन आहे. सन २०१७-१८ या वित्तीय वर्षामध्ये ५९ कोटी ६६ लाख रुपये एवढा निधी प्रस्तावित आहे.

२१. राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत सध्या ४ लाख ९ हजार कामे प्रगतिपथावर आहे. चालू वर्षात ७ कोटी २५ लाख मनुष्य दिवस रोजगार निर्माण होणे अपेक्षित आहे. ही योजना " मागणी आधारित काम " या स्वरुपाची आहे. दिनांक १ एप्रिल २०१७ पासून मजूरीचा दर १९२ रुपयांवरुन २०१ रुपये इतका होणार आहे. सन २०१७-१८ मध्ये सुमारे २ हजार ८०० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या कार्यक्रमाकरिता निधी कमी पडू दिला जाणार नाही.

**परस कुक्कुट पालन**

२२. परसातील कुक्कुट पालनास प्रोत्साहन देत ही प्रक्रिया रोजगारक्षम करण्याच्या दृष्टीने राज्यातील ३०२ तालुक्यांमध्ये सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वांवर सघन कुक्कुट विकास गटाची स्थापना करण्यात येणार आहे.

**फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालय**

२३. राज्याच्या दुर्गम भागातील जीवनमानाला पशुपालनाचा मोठा आधार राहिला आहे. पशुधन सुदृढ व निरोगी राहावे या दृष्टीने पशुआरोग्य सेवा पशुपालकांच्या दारापर्यंत उपलब्ध करुन देण्यासाठी ३४९ फिरते पशुवैद्यकीय चिकित्सालयाची स्थापना करण्यात येईल.

२४. राज्यात मेंढी पालनास प्रोत्साहन मिळण्यासाठी पारंपरिक मेंढी पालन करणाऱ्या लाभार्थ्यांना ७५ टक्के अनुदानावर मेंढी गटाचे वाटप करण्यात येईल. यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. योजनेची फलश्रुती लक्षात घेऊन व्याप्ती वाढविण्याबाबत नंतर विचार करण्यात येईल.

२५. समुद्र किनारी असलेल्या कांदळवन क्षेत्रात खेकडा, ऑईस्टर, मुसल्स् इत्यादींचे उत्पादन आणि पर्यटन या उपजिविकेच्या माध्यमांना चालना देण्यासाठी कांदळवन सह-व्यवस्थापन समितीद्वारे रोजगार निर्मिती करण्याची योजना आहे. त्याकरिता १५ कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित करण्यात येत आहे.

राज्यातील खेकडा थेट परदेशात निर्यात होतो परंतु खेकड्याची उपजकेंद्र (Hatchery) तामिळनाडूमध्ये आहे. ही बाब लक्षात घेता तामिळनाडूच्या धर्तीवर सिंधुदूर्ग जिल्ह्यात खेकडा उपजकेंद्र सुरु करण्यात येईल व यासाठी

९ कोटी ३१ लाख इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच कोळंबी बीज उत्पादन केंद्राच्या माध्यमातून कोळंबी उत्पादनात वाढ करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे.

२६. ग्रामीण भागात बांबू हा कल्पवृक्ष समजला जातो. बांबू क्षेत्राचा विकास करण्यासाठी महाराष्ट्र राज्य बांबू प्रवर्तन ही बहुविध हितसंबंधी (Multiple Stakeholder Organization) यंत्रणा स्थापित करण्याचे नियोजित आहे. त्याकरिता १५ कोटी रुपयांचा निधी प्रस्तावित आहे.

२७. राज्यात सुमारे ३ कोटी ९९ लाख एवढे असंघटित कामगार आहेत. समाजातील या महत्त्वाच्या घटकांच्या विकासासाठी एक स्वतंत्र असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा मंडळ स्थापन करण्याचे शासनाने ठरविले असून त्या माध्यमातून असंघटीत कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येतील.

२८. राज्य शासनाने यावर्षीपासून रोजगार निर्मितीवर विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. यासाठी विविध विभागांकडून रोजगार निर्मिती तसेच कौशल्य विकासावर विशेष भर देण्यात येणार आहे. अशा रोजगार निर्मिती व कौशल्य विकासाच्या सर्व योजनांचे समन्वयन, देखरेख व नियंत्रण व्हावे यासाठी नियोजन विभागाच्या अखत्यारीत एक नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येत आहे.

**मनुष्यबळ विकास**

२९. मुंबई विद्यापीठाने देशाला ज्ञानाचे प्रशस्त दालन उपलब्ध करुन दिले. त्या मुंबई विद्यापीठाला लवकरच १६० वर्षे पूर्ण होत असून, सदर विद्यापीठांतर्गत असलेला अर्थशास्त्र विभाग हा देशातील सर्वात जुना अर्थशास्त्र विभाग लवकरच शतकपूर्ती पूर्ण करणार आहे. कालानुरुप होत असलेले बदल विचारात घेऊन अर्थशास्त्र विभागाचे नामकरण "मुंबई अर्थशास्त्र व सार्वजनिक धोरण संस्था (Mumbai School of Economics and Public Policy)" असे करण्यात येणार असून विभागाची पुनर्रचना करण्यात येणार आहे. यासाठी यावर्षीपासून पुढील पाच वर्षात २५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

३०. उच्च शिक्षणाच्या गुणवत्तेवरच जागतिक पातळीवरील स्पर्धेत राष्ट्र गौरवाने उभे राहत असते. राज्यातील उच्च शिक्षणाची गुणवत्ता व पाया यांचे सबलीकरण

करण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान (रुसा) हा केंद्र शासनाचा कार्यक्रम राबविण्यात येत असून या योजनेअंतर्गत प्राप्त होणाऱ्या वित्तलब्धीच्या अनुषंगाने राज्य शासनाचा ४० टक्के हिस्सा राज्य शासन उचलणार असून त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण ४० कोटी रुपये निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

३१. औरंगाबाद येथे राष्ट्रीय विधी विद्यापीठ सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून सुरु होत आहे. राज्यातील मुंबई, नागपूर व औरंगाबाद या तीन विधी विद्यापीठांचा विकास करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण ३९ कोटी २८ लाख रुपये निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

**चंद्रपूर सैनिक शाळा**

३२. केंद्र शासनाच्या संरक्षण मंत्रालयाच्या माध्यमातून सातारा येथील सैनिकी शाळेच्या धर्तीवर चंद्रपूर येथे सैनिकी शाळा सुरु करण्याचा शासनाने निर्णय घेतला असून पुढील दोन वर्षात सदर सैनिक शाळा बांधण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी टप्प्याटप्प्याने २०० कोटी रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

## पायाभूत सुविधा

पायाभूत सुविधा प्रगतीचा मार्ग प्रशस्त करीत असतात. आमच्या राज्यात येणाऱ्या उद्योग समूहांना उत्तम रस्ते, दळणवळणाच्या सोयीसाठी उत्तम रेल्वे प्रकल्प, आरोग्यपूर्ण वातावरण, स्वच्छ पाणीपुरवठा देणे आमचे कर्तव्य आहे. या पायाभूत सुविधांनी उद्योग जगताची भरभराट तर होईलच पण ही कीर्ती इतर अनेक उद्योग समुहांना आमच्या राज्यात उद्योग समूह स्थापन करण्यास प्रेरणादायी ठरेल आणि त्यातून रोजगाराच्या अनेक संधीही निर्माण होईल. यासाठी या अर्थसंकल्पात मी पायाभूत सुविधा अधिक सक्षम होण्याच्या दृष्टीने खालील योजना जाहीर करतो.

रस्ते

३३. “American roads are not good because America is rich, but America is rich because American roads are good” हे अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष जॉन एफ. केनडी यांचे वाक्य प्रसिद्ध आहे. रस्त्यांच्या सुधारणेसाठी हे शासन अतिशय जागरुक असून रस्ते सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणात तरतूद करण्यात आली आहे. सार्वजनिक बांधकाम विभागास

मागील वर्षी ४ हजार ३५७ कोटी रुपये इतकी तरतूद उपलब्ध करुन देण्यात आली होती. आता सन २०१७-१८ करिता ७ हजार कोटी रुपये इतकी तरतूद रस्ते बांधकाम व सुधारणा कार्यक्रमासाठी मंजूर करण्यात आली आहे.

**हायब्रीड ॲन्युईटी**

३४. सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत हायब्रीड ॲन्युईटीमध्ये ३० हजार कोटी रुपये इतक्या अंदाजित किमतीची १९५ कामे अर्थसंकल्पित करण्यात आली असून त्यासाठी ३ हजार ५०० कोटी रुपयांची तरतूद सन २०१७-१८ मध्ये करण्यात आली आहे. या कामांसाठी लिडार पद्धतीने सर्वेक्षण करुन नकाशे व अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही सुरु आहे व ही सर्व माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. या कामांमध्ये १० हजार कि.मी. रस्त्यांचे काम २ वर्षात पूर्ण होईल व रस्त्याच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी १० वर्षांकरिता संबंधित कंत्राटदारांकडे राहील.

३५. सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत उपलब्ध निधीमधून प्रत्येक रस्त्याच्या किमान १० किलोमीटर लांबीच्या देखभाल दुरुस्तीचे काम अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आले आहे. तसेच रस्त्यांच्या सुधारणेकडे विशेष लक्ष पुरविण्यात येणार आहे.

३६. केंद्रीय मार्ग निधी (Central Road Fund) मधून हाती घेतलेल्या कामांसाठी या वर्षापासून विशेष आवर्ती तरतूद करण्यात आली आहे. केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत सन २००१ ते सन २०१३ पर्यंत सुमारे २ हजार ५५४ कोटी ४६ लाख एवढ्या किंमतीची कामे मंजूर झालेली आहेत. केंद्रात नवे सरकार सत्तारुढ झाल्यानंतर सन २०१४-१५ ते सन २०१६-१७ या तीन वर्षात केंद्रीय मार्ग निधी या योजनेंतर्गत सुमारे ५ हजार २९३ कोटी ७६ लाख रुपये एवढ्या किमतीची कामे मंजूर झालेली आहेत. ऑक्टोबर २०१४ पासून सुमारे ४ हजार ४५६ यामधून २ हजार २११ कि.मी. रस्त्यांची लांबी सुधारण्यात येत असून २५२ मोठ्या पुलांचे बांधकाम पूर्ण करण्यात येत आहे. ही प्रगती मला अभिमानाने नोंदवावीशी वाटते. यासाठी मी केंद्र सरकारचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

३७. मार्च २०१४ अखेर राज्यातील राष्ट्रीय महामार्गाची लांबी ४ हजार ५७१ कि.मी होती. महाराष्ट्र राज्यातील राष्ट्रीय महामार्गांची एकूण लांबी आता

१५ हजार ४०४ कि.मी इतकी झाली आहे. महाराष्ट्राच्या स्थापनेपासून गेल्या ५४ वर्षात राष्ट्रीय महामार्गाची लांबी ४ हजार ५७१ कि.मी. होती. ती गेल्या २ वर्षात १० हजार ८३३ कि.मी. ने वाढली आहे. या प्रगतीचा मी गौरवाने उल्लेख करु इच्छितो.

**मुख्यमंत्री ग्राम सडक योजना**

३८. ग्रामीण जनतेच्या जीवनातील दळणवळण सुकर करणाऱ्या मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत ४ हजार ७०० किलोमीटर लांबीचे रस्त्यांचे काम प्रगतीपथावर आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण १ हजार ६३० कोटी रुपये निधी राखून ठेवण्यात आला आहे. त्याचबरोबर वार्षिक जिल्हा योजनेंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे आणि ५७० कोटी रुपये एवढा निधी पंतप्रधान ग्राम सडक योजनेंतर्गत मिळणे अपेक्षित आहे. यामुळे ग्रामीण रस्त्यांची मोठ्या प्रमाणात सुधारणा होणार आहे.

**रेल्वे**

३९. राज्यातील प्रलंबित रेल्वे प्रकल्पांच्या जलद अमंलबजावणीकरता रेल्वे मंत्रालयासोबत भागीदारीतून " महाराष्ट्र लोहमार्ग पायाभूत सुविधा विकास कंपनी " स्थापनेकरिता भागभांडवलासाठी रु.५० कोटी निधी देण्यात येत आहे. तसेच रेल्वे मंत्रालय व राज्य शासन यांचे संयुक्त भागीदारीतून तयार करण्यात येत असलेल्या अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ, वर्धा-यवतमाळ-नांदेड, वडसा देसाईगंज-गडचिरोली या ३ रेल्वे प्रकल्पासाठी १५० कोटी रुपये निधी देण्यात येत आहे. हे तीनही रेल्वे प्रकल्प जलदगतीने पूर्ण व्हावेत यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

**बंदरे**

४०. राज्य शासनाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून जवाहरलाल नेहरु बंदर न्यास यांच्या समवेत संयुक्त उपक्रम करारनामा केला असून त्याद्वारे वाढवण, ता. डहाणू, जि. पालघर येथे सॅटेलाईट टर्मिनल उभारले जाणार आहे. यासाठी महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून २६ टक्के समभागाची गुंतवणूक केली आहे. राज्य सरकारच्या समभाग गुंतवणुकीतून कॉर्पोरेट मेजर पोर्ट उभारण्याचा हा देशातील पहिलाच प्रकल्प आहे.

बंदर जोडणी प्रकल्पांना चालना देण्यासाठी राज्य शासनाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या माध्यमातून जयगड-डिगणी व दिघी-रोहा रेल्वे प्रकल्पामध्ये समभाग गुंतवणूक केली आहे. सन २०१७-१८ करिता बंदर क्षेत्राच्या विकासाकरिता

७० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात येत आहे. सिंधुदुर्ग व रत्नागिरी जिल्ह्यातील आंबा व अन्य फळपिके मुंबई, वाशी येथे पाठविली जातात व आखाती देशामध्ये निर्यात होतात. या फळांच्या समुद्रमार्गे वाहतुकीसाठी आवश्यक त्या मूलभूत सुविधा निर्माण करण्याची आवश्यकता, तांत्रिक व आर्थिक सक्षमतेचे मूल्यमापन करुन घेण्यात येणार आहे.

सागरमाला कार्यक्रमांअतर्गत ८ जेट्टींच्या बांधकामाकरिता केंद्र शासनाकडून १७ कोटी ९५ लाख रुपये निधी प्राप्त झाला असून सदर जेट्टींच्या बांधकामाची अंदाजे किंमत ७१ कोटी ७८ लाख इतकी असून त्याकरिता ५० टक्के निधीची तरतूद राज्य शासनातर्फे व उर्वरित ५० टक्के सागरमाला कार्यक्रमाअंतर्गत करण्यात येणार आहे. यामध्ये गोराई, वसई, भाईंदर, नारांग्री, खारवा देषरी, मानूरी, घोडबंदर आणि मालवण प्रवासी जेट्टी यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे अंतर्गत जलवाहतूक तसेच पर्यटनाला चालना देण्यासाठी प्रामुख्याने सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कर्ली, देवबाग, देवली, वेंगुर्ला, मालवण या भागामध्ये अस्तित्वातील जेट्टींचे बळकटीकरण व प्रवासी पर्यटकांच्या सोयीकरिता मूलभूत सुविधांचे आधुनिकीकरण करणे प्रस्तावित आहे.

**विमानतळ** ४१. जगाला श्रद्धा आणि सबुरीचा मंत्र देत जगण्याची दिशा देणारे श्री साईबाबा यांच्या तीर्थक्षेत्र शिर्डी येथील समाधीला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्ताने शिर्डी येथील विमानतळाचा जलदगतीने विकास करण्याचा शासनाचा मानस असून त्याव्यतिरिक्त महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारितील कराड, अमरावती, सोलापूर व चंद्रपूर इत्यादी विमानतळांचा विकास आणि प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन इत्यादीसाठी सन २०१७-१८ मध्ये ५० कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

तसेच नागपूर येथील मिहान प्रकल्पासाठी सन २०१७-१८ मध्ये १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात येत आहे. नागपूर विमानतळ आंतरराष्ट्रीय दर्जाचे करण्याची प्रक्रिया सुरु झाली असून त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

ऊर्जा ४२. वीज आणि पाण्याची बचत हे आज आमचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. या कर्तव्याला पर्यावरणपूरक दृष्टीकोनाची जोड देत राज्यातील सर्व इमारती यापुढे हरित इमारती (Green Building) म्हणून बांधण्यात येतील. यामुळे निवासी तसेच अनिवासी इमारतीमध्ये मोठ्या प्रमाणात वीज व पाण्याची बचत होणार आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाकडे देखभाल व दुरुस्तीसाठी असलेल्या इमारतींचे टप्प्याटप्प्याने हरित इमारतींमध्ये रूपांतर (Retro fitting) करून विद्युत व पाणी वापराची व खर्चाची बचत होईल.

४३. केंद्र शासनाकडून अपारंपारिक ऊर्जेकरिता प्राप्त झालेल्या प्रोत्साहानात्मक अनुदानाच्या रकमेपोटी सन २०१७-१८ मध्ये ३६१ कोटी रुपये एवढा निधी प्रस्तावित आहे.

४४. महानिर्मिती कंपनीकडून राज्यात पहिल्या टप्प्यामध्ये ७५० मेगा वॅटचा सौर उर्जा प्रकल्प नियोजित आहे. त्याकरिता शासनाचे भाग भांडवलासाठी ५२५ कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

४५. विदर्भ व मराठवाडा विभागात अधिकाधिक नवीन उद्योग यावेत व औद्योगिक वीज वापर वाढावा याकरीता औद्योगिक घटकास सर्वसाधारण व प्रोत्साहानात्मक बाबीवर वीज दरात सवलत देण्यासाठी १ हजार कोटी रुपये एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

**उद्योग**

४६. औद्योगिकदृष्ट्या मागासलेल्या भागात नवीन उद्योग निर्माण व्हावेत यासाठी राज्य शासनामार्फत " Package Scheme of Incentives " ही प्रोत्साहानात्मक योजना राबवली जाते. या योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये २ हजार ६५० कोटी रुपये एवढा निधी प्रस्तावित आहे.

४७. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेचा मुख्य उद्देश राज्यातील सुक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची उत्पादकता व स्पर्धाक्षमता उंचावण्यासाठी तसेच त्यांच्या क्षमता वृद्धिकरिता सामाईक सुविधा निर्माण करणे हा आहे. याकरिता सन २०१७-१८ मध्ये ६० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून देण्यात येत आहे.

४८. महाराष्ट्र राज्य औद्योगिक समूह विकास योजनेअंतर्गत गुंतवणूकदारांना औरंगाबाद येथे जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे. केंद्र शासनामार्फत या योजनेसाठी अंशदान म्हणून ५७० कोटी रुपये सन २०१७-१८ मध्ये उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

महाइन्फ्रा ४९. पायाभूत सुविधांसाठी मोठ्या प्रमाणात भांडवलाची आवश्यकता असते. आगामी ५ वर्षात राज्यातील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी अंदाजे रुपये १ लक्ष कोटी वित्तीय भांडवल लागेल. राज्याची वाढती वित्तीय तूट पाहतां, पायाभूत सुविधांच्या विकासासाठी निधी उभारण्याकरिता अन्य पर्यायी मार्ग शोधण्याची गरज आहे. ही बाब विचारात घेऊन ‘पायाभूत सुविधा निधी’ स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. याकरिता ‘महाइन्फ्रा’ (MAHAINFRA) ही विशेष हेतुवहन यंत्रणा स्थापन करण्याचे विचाराधीन आहे.

विविध शासकीय विभागांच्या ताब्यातील त्यांच्या वापरात नसलेली तसेच पुढील १० वर्षात संबंधित विभागास विकास कामाकरिता आवश्यक नसलेली जमीन एकत्रित करण्यासाठी वरील संस्था ‘एक खिडकी’ म्हणून काम करेल. पायाभूत सुविधांसाठी निधी उभारण्याकरिता ही जमीन विशेष हेतुवहन यंत्रणेकडे सुपूर्द केली जाईल. या जमिनीच्या सुरक्षा ठेवीच्या आधारे मोठे गुंतवणूकदार जसे राष्ट्रीय/ आंतरराष्ट्रीय निवृत्ती वेतन व विमा निधी यांच्याकडून कमी व्याज दर/ बॉन्डस्/ गुंतवणूक याद्वारे निधी उभारण्यास मदत होईल.

अशा प्रकारे वरील संस्था राज्य शासनाची गरजेनुसार वित्त पुरवठा, निधी उभारणी व सल्लागार यंत्रणा असेल. या संस्थेची कार्यक्षमता वाढविण्यासाठी विविध क्षेत्रातील विषय तज्ज्ञांची नियुक्ती शासनामार्फत केली जाईल. गुजरात राज्य वित्तीय सेवा लिमिटेड (Gujrat State Financial Services Ltd) च्या धर्तीवर ‘महाइन्फ्रा’ या संस्थेचे बँकेतर वित्तीय कंपनीत रुपांतर करण्याची शक्यताही शासनाकडून पडताळून पाहण्यात येत आहे.

### पाणीपुरवठा व स्वच्छता

५०. दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत १० जिल्हे, १०३ तालुके आणि १४ हजार ग्रामपंचायती हगणदारीमुक्त घोषीत करण्यात आल्या

आहेत. तसेच, मार्च, २०१८ अखेरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र राज्य हगणदारी मुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राज्य आणि जिल्हास्तरावरील योजनांमध्ये एकूण ५४५ कोटी ६६ लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

५१. राज्यातील ग्रामीण व दुर्गम भागातील पाण्याची समस्या सोडविण्याच्या उद्देशाने हाती घेण्यात आलेल्या " मुख्यमंत्री ग्रामीण पेयजल कार्यक्रम " या महत्वाकांक्षी कार्यक्रमासाठी सन २०१७-१८ मध्ये ३०० कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. त्यामधून ५०० नवीन पाणीपुरवठा योजनांना मान्यता देण्याचे नियोजन आहे. यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जातो.

५२. शाश्वत व गुणवत्तापूर्ण पाणीपुरवठा करण्यासाठी जलस्वराज्य-२ या कार्यक्रमांतर्गत ३९ निमशहरी गावांना वाढीव पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करण्यात येत आहेत. सन २०१७-१८ मध्ये यासाठी २०० कोटी रुपये एवढी तरतूद करण्यात आली आहे.

५३. मराठवाडा विभागात गेल्या अनेक वर्षांपासून विशिष्ट अशा कालावधीनंतर दुष्काळास सामोरे जावे लागते. मागील वर्षी लातूर जिल्ह्यास रेल्वेने पाणीपुरवठा करावा लागला होता. यासंदर्भात कायमस्वरुपी उपाययोजना करण्याचा शासनाचा मानस आहे. पिण्याचे पाणी, शेती व उद्योगासाठी पाणी दुष्काळसदृश्य परिस्थितीतही कमी पडणार नाही. याकरिता एकात्मीक ग्रीड पद्धत वापरुन पाणी टंचाईवर मात करणे शक्य आहे. त्या अनुषंगाने पूर्वव्यवहार्यता अहवाल तयार करण्यासाठी पाणीपुरवठा विभागास रुपये १५ कोटी इतकी अतिरिक्त तरतूद उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**नागरीकरण**

छोट्या शहरांचे मोठ्या शहरात रुपांतर होताना तेथील नागरीकरण सुसह्य व्हावे, सगळ्यांना उत्तम सोयी सुविधा मिळाव्या, जीवनाचा आनंद वाढावा, समृद्ध नगर विकासाचे जनतेचे स्वप्न पूर्ण व्हावे, यासाठी स्मार्टसिटी योजना आम्ही राबवतो आहे. त्यासोबतच ज्या शहरांचा समावेश स्मार्टसिटी योजनेत झालेला नाही, तेथील

महानगरपालिकांना स्वतंत्र निधी देण्याचा आमचा संकल्प आहे. या धोरणांतर्गत मी या अर्थसंकल्पात खालील योजना जाहीर करत आहे.

५४. महाराष्ट्र राज्यातील सर्व नगरपरिषदा / नगरपंचायती व ड वर्ग महानगरपालिकांच्या क्षेत्रात नागरी पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान राबवण्यात येत आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये रुपये ११०० कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित आहे.

५५. स्मार्ट सिटी अभियानांतर्गत महाराष्ट्रातील १० संभाव्य स्मार्ट शहरांपैकी पहिल्या फेरीत पुणे व सोलापूर शहरांची तर दुसऱ्या फेरीत कल्याण, डोंबिवली, नागपूर, नाशिक, ठाणे व औरंगाबाद या पाच शहरांची निवड झालेली आहे. स्मार्ट सिटी योजनेत सर्वाधिक ७ शहरांची निवड झालेले महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य आहे. या प्रयोजनासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात केंद्र व राज्य हिस्सा मिळून १ हजार ६०० कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित आहे.

५६. नागरी क्षेत्रातील पाणीपुरवठा, मलनिस्सारण व नागरी परिवहन सांडपाण्याचा पुनर्वापर, हरितपट्टे या मूलभूत सुविधांचा विकास करण्यासाठी केंद्र शासनाने अटल मिशन फॉर रिज्युवनेशन ॲन्ड अर्बन ट्रान्सफॉरमेशन (अमृत) ही योजना अंमलात आणली आहे. या योजनेचा राज्यातील ४४ शहरे व ७६ टक्के नागरी लोकसंख्येस लाभ मिळणार आहे. या प्रयोजनासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात केंद्र व राज्य हिस्सा मिळून १ हजार ८७० कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित आहे.

५७. आपलं एक हक्काचं घर असावं, हे प्रत्येकाचं स्वप्न असतं. या स्वप्नपूर्तीसाठी प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) या अंतर्गत शहरी भागात सन २०१७-१८ मध्ये २ लाख ५० हजार घरे बांधण्याचे काम सुरु करण्यात येणार आहे. यासाठी लागणारा राज्य हिश्याचा निधी, निवारा निधीतून आणि अर्थसंकल्पीय तरतुदीतून भागविण्यात येणार आहे.

५८. देशातील सर्व शहरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि सुंदर करुन सर्व नागरिकांना चांगले आरोग्य व स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियानाची देशात सुरुवात केली आहे. केंद्र शासनाच्या या अभियांनाअंतर्गत राज्यात नागरी क्षेत्रात स्वच्छ महाराष्ट्र अभियान प्रभावीपणे राबविण्यात येत असून

त्यास नागरिकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या प्रयोजनासाठी सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पात केंद्र व राज्य हिस्सा मिळून १ हजार ६०५ कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित आहे.

### मुंबई प्रकल्प

५९. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. महानगराच्या वेगाशी जुळवून घेताना सर्वसामान्य नागरिकांची दमछाक होते आहे. यावर उपाययोजना करत या शहरामध्ये राहणाऱ्या नागरिकांचे जीवन सुसह्य व्हावे यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करण्यात येत आहेत. त्या अंतर्गत या शहरात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहेत.

मेट्रो रेल्वे लाईन- ३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो मार्ग काम प्रगतीपथावर असून तसेच मुंबई मेट्रो २अ : दहिसर ते डी. एन. नगर आणि मुंबई मेट्रो रेल्वे लाईन- ७ दहिसर ते अंधेरी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे.

या मेट्रो प्रकल्पांसाठी तसेच पुणे व नागपूर मेट्रो प्रकल्पांसाठी मिळून सन २०१७-१८ मध्ये ७१० कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

६०. याव्यतिरिक्त मुंबई महानगर क्षेत्रात मुंबई शिवडी न्हावा शेवा, नवी मुंबई विमानतळ, नवी मुंबई मेट्रो, किनारी दुतमार्ग हे विविध प्रकल्प हाती घेतले असून, हे प्रकल्प लवकर पूर्ण करण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

### आरोग्य

" आरोग्यम धनसंपदा " असे म्हणत आमच्या संस्कृतीने आरोग्याला सर्वोच्च दर्जा दिला आहे. पण आजच्या बदलत्या जीवनमानात आरोग्याच्या संदर्भात अनेक अडचणी निर्माण होत आहेत. समाज स्वास्थ्याच्या या प्रश्नाकडे गांभीर्याने बघत निरोगी महाराष्ट्र घडविण्याचा या सरकारचा मानस आहे. यासाठी मी या अर्थसंकल्पात खालील उपाययोजना जाहीर करत आहे.

६१. औरंगाबाद येथील कर्करोग रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन त्याची राज्यस्तरीय कर्करोग संशोधन संस्था निर्माण करण्याबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये १२६ कोटी रुपये एवढा निधी प्रस्तावित आहे. तसेच

राज्यातील कर्करोग रुग्णांना अत्याधुनिक उपचार नजिकच्या अंतरावर उपलब्ध होण्याकरिता महसूल विभागनिहाय कर्करोग उपचार केंद्रे निर्माण करण्याचा मानस आहे.

६२. कर्करोगावरील उपचारपद्धतीत निदानाच्या सोयी उपलब्ध असल्यास रुग्णांना पूर्णपणे बरे होण्यास मदत होते. भारतात प्रामुख्याने आढळणाऱ्या कर्करोगात स्तनाचा कर्करोग, गर्भाशय मुखकर्करोग आणि मुखकर्करोग यांचा समावेश होतो. या तीनही कर्करोगामध्ये लवकर निदान आणि वेळेत योग्य ते उपचार झाल्यास बरे होण्याचे प्रमाण हे साधारणत: ७० ते ७५ टक्के असते. त्याचप्रमाणे या कर्करोगामधून होणारा मृत्यूचा दर जवळ-जवळ ६० ते ७५ टक्क्यांनी कमी होतो. या तीनही कर्करोगाचे रोगनिदान प्रथामावस्थेत करावयाचे असल्यास शासकीय आरोग्यसंस्थामध्ये मॅमोग्राफी मशीन, कोल्पोस्कोप व व्हेलस्कोप मशीन आवश्यक आहे. शासकीय आरोग्य संस्थामध्ये तीनही यंत्रे उपलब्ध करुन त्यांच्याद्वारे रुग्णांचे निदान करण्यात येईल. स्क्रीनींगमध्ये निदर्शनास आलेल्या रुग्णांना महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत जवळच्या रुग्णालयात पाठविण्यात येईल. सदरील यंत्रसामुग्री जिल्हा रुग्णालये (२३), सामान्य रुग्णालये (४), उप जिल्हा रुग्णालये (८५), स्त्री रुग्णालये (११), निवडक ग्रामीण रुग्णालये (१३०) अशा एकूण २५३ आरोग्य संस्थामध्ये उपलब्ध करुन देण्यात येईल. यासाठी सन २०१७-१८ मध्ये ४३ कोटी रुपये एवढा निधी राखून ठेवण्यात येत आहे.

६३. सर्वसामान्य रुग्णांना अचूक रोगनिदानासाठी सीटी स्कॅन मशीन सार्वजनिक आरोग्य विभागाच्या निवडक ३१ रुग्णालयांसाठी उपलब्ध करुन देण्याचा शासनाने निर्णय घेतला असून त्यासाठी सन २०१७-१८ मध्ये ७७ कोटी ५० लाख एवढा निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

६४. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेची व्याप्ती विस्तारुन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेतील वैद्यकीय उपचारांचा लाभ देण्याकरिता आर्थिक वर्ष सन २०१७-१८ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे. या नवीन योजनेमध्ये नवीन लाभार्थी घटकांचा समावेश, प्रति कुटुंब प्रति वर्ष विमा संरक्षणाच्या मर्यादेत वाढ, अंगीकृत रुग्णालयांच्या संख्येत वाढ, नवीन उपचार पद्धतींचा समावेश इत्यादी बाबींचा अंतर्भाव आहे. सदर योजनेसाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण १ हजार ३१६ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

६५. गरीब, दुर्लक्षित तसेच गरजू ग्रामीण जनतेस सहजसाध्य, परवडण्याजोगी, कार्यक्षम, उत्तरदायी आणि विश्वासार्ह आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने केंद्र शासनाने संपूर्ण देशात १२ एप्रिल २००५ पासून राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान सुरु केले आहे. आरोग्यावर परिणाम करणाऱ्या आहार, परिसर स्वच्छता, सुरक्षित पाणीपुरवठा, महिला व बालविकास या महत्त्वाच्या घटकांचा सदर अभियानामध्ये एकत्रित विचार करण्यात आला आहे. राज्यातील जनतेला विशेषतः ग्रामीण जनता, गरीब, महिला व बालके यांना गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करुन देणे, हे या अभियानाचे उद्दिष्ट आहे. या कार्यक्रमासाठी १ हजार ५४९ कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

६६. शहरी भागातील गरीब व दुर्लक्षित घटक आरोग्य सुविधांपासून वंचित राहू नये यासाठी केंद्र सरकारने सन २०१३-१४ या आर्थिक वर्षापासून राष्ट्रीय शहरी आरोग्य अभियान सुरू करण्यास मंजुरी दिली आहे. त्या अनुषंगाने सन २०११ च्या जनगणनेनुसार राज्यातील ५० हजारपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या शहरांमध्ये हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमासाठी सन २०१७-१८ मध्ये २११ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

६७. राज्यातील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये आणि रुग्णालयांचे बांधकाम व बळकटीकरण यासाठी सन २०१४-१५ च्या २३२ कोटी ७४ लाख रुपयांच्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये ५५९ कोटी ३० लाख रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

६८. महाराष्ट्र, कर्नाटक व गोवा सीमा भागात आढळून येत असलेल्या माकडताप या रोगासाठी निदान उपचार, प्रशिक्षण व संशोधन यासाठी साथरोग संशोधन प्रयोगशाळा सिंधुदुर्ग जिल्ह्यात उभारण्यात येईल.

**पर्यावरण व वने**

पर्यावरणाच्या प्रश्नाकडे गांभीर्याने बघत गेल्यावर्षी सरकारने दोन कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प केला होता. महाराष्ट्रातील जनतेने या प्रकल्पाला मनापासून दाद देत २ कोटी ८३ लाख वृक्षलागवड करुन या प्रश्नाविषयीची सजगता व्यक्त केली. या विक्रमी वृक्ष लागवडीची दखल “ लिमका बुक ऑफ रेकॉर्ड ” ने घेतली. वनसंवर्धनासोबतच पर्यावरणाच्या दृष्टीने वाढत्या प्रदुषणावर मात करत पर्यावरण पूरक वातावरणाची निर्मिती करणे हे आमच्या सरकारचे महत्त्वाचे धोरण आहे.

प्रदुषणाच्या विरोधातील हा लढा अधिक तीव्र करीत नद्यांच्या शुद्धिकरणाला प्राधान्य देणारे “ नमामि चंद्रभागा ” हे अभियान आम्ही हाती घेतले असून ही प्रक्रिया पुढे नेत राज्यातील प्रमुख नद्या प्रदुषणमुक्त करण्याचा सरकारचा दृढ निर्धार आहे. यासाठी या अर्थसंकल्पात मी खालील योजना जाहीर करतो.

६९. केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत मुळा मुठा नदीचे जलप्रदुषण कमी करण्यासाठी ९९० कोटी २६ लाख रुपयांची योजना मंजूर झाली आहे. यासाठी ६ वर्षाचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासनाकडून सुमारे १०० कोटी रुपये अर्थसहाय्य प्राप्त होणे अपेक्षित आहे.

७०. स्थानिक जनमानसात पर्यावरणविषयक जनजागृती करणे, स्थानिक पर्यावरणाच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी विविध योजना, प्रकल्प व कार्यक्रम राबविणे या योजनेतून अपेक्षित आहे. त्यासाठी राज्यातील १२ जिल्ह्यांमधील ५० माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळामध्ये पर्यावरणे सेवा राबविण्यात येत आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये २० कोटी ८८ लाख रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

७१. मानव-वन्यजीव संघर्षाची तीव्रता कमी करुन दोघांचेही जगणे सुकर व्हावे या प्रक्रियेत महत्त्वपूर्ण ठरलेल्या डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास या योजनेची व्याप्ती वाढवून त्याअंतर्गत वन्य प्राण्यांमुळे पिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी Chain Link Fencing योजना कार्यान्वित करणे आणि वनाशेजारील गावातील लोकांचे वनावरील अवलंबित्व कमी करण्यासाठी १०० टक्के कुटुंबांना गॅस सिलिंडर वाटप योजना लागू करण्याचे प्रस्तावित आहे. ही योजना वनग्रामांनाही लागू करण्यात येत असून त्याकरिता प्रत्येकी रुपये २५ कोटी रुपये इतका निधी सन २०१७-१८ मध्ये प्रस्तावित करण्यात आला आहे. तसेच मानव व वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी अभयारण्यातून स्वखुषीने स्थलांतरीत होणाऱ्या गावांतील लोकांसाठी जमीन मोबदला बाजारभावाच्या चार पट देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यासाठी सन २०१७-१८ मध्ये ४५ कोटी एवढी तरतूद प्रस्तावित करण्यात येत आहे.

७२. वनामध्ये उन्हाळ्यामध्ये आणि अन्य वेळी लागणाऱ्या वणव्यांच्या घटनांवर तात्काळ नियंत्रण करण्यासाठी कर्मचारी/अधिकारी यांची नवीन तंत्रज्ञान व

कार्यपद्धतीव्दारे क्षमतावृध्दी करणे गरजेचे आहे. त्यासाठी चंद्रपूर वन अकादमी संकुल परिसरात नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन संदर्भात प्रशिक्षण तसेच प्रत्यक्ष कृती दल केंद्राची स्थापना करणे प्रस्तावित आहे. त्याकरिता सन २०१७-१८ मध्ये ५ कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

७३. नवेगांव-नागझिरा, पेंच व्याघ्र प्रकल्प, इतर व्याघ्र प्रकल्प, वाघांचे अस्तित्व असलेली उमरेड कऱ्हांडलासारख्या अभयारण्याचे संरक्षित क्षेत्र आणि वनक्षेत्र येथे निसर्ग पर्यटनाला मोठ्या प्रमाणात प्रोत्साहन देण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये ८० कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

७४. जनतेच्या सहभागाने गेल्या वर्षी अतुलनीय यश गाठणाऱ्या विक्रमी वृक्ष लागवडीच्या प्रक्रियेत सातत्य ठेवण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुषंगाने पुढील ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्षारोपण करण्याचे नियोजन आहे. त्यानुसार सन २०१७ मध्ये ४ कोटी, सन २०१८ मध्ये १३ कोटी आणि सन २०१९ मध्ये ३३ कोटी वृक्ष लागवड करणे नियोजित आहे.

## सामाजिक विकास

धर्म, भाषा, पंथ, उपासनापध्दती आदी पातळ्यांवर महाराष्ट्राने आपली विविधता जपली आहे. ही विविधता जपतांना " सबका साथ सबका विकास " या उक्तीप्रमाणे सर्व घटकांना न्याय मिळावा ही आमच्या सरकारची भूमिका आहे. सामाजिक न्याय, आदिवासी, अल्पसंख्याक, महिला व बालके या साऱ्या घटकांपर्यंत योग्य सोयी सुविधा पोहचविणे आवश्यक आहे. यासाठी मी या अर्थसंकल्पात खालील योजना जाहीर करित आहे.

**अनुसूचित जाती उपयोजना**

७५. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती उपयोजनेसाठी एकूण ७ हजार २३१ कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे. त्यापैकी २७०० कोटी रुपये जिल्हा योजनांसाठी तर ४ हजार ५३१ कोटी रुपये राज्यस्तरीय योजनांसाठी देण्यात येत आहेत. या अंतर्गत प्रामुख्याने आरोग्य सेवेसाठी १२७ कोटी ४५ लाख रुपये, अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठीच्या रमाई घरकूल ग्रामिण योजनेसाठी ६०० कोटी रुपये तसेच शासकीय वस्तीगृह सुरु करणे व त्यांचे परीरक्षण या करिता ३३३ कोटी ३० लाख रुपये आणि निवासी शाळा सुरु करण्यासाठी २०१ कोटी ५ लाख एवढी तरतूद प्रस्तावित आहे. तसेच चंद्रपूर येथील दीक्षाभूमीवर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन उभारण्याचा निर्णय झाला असून त्यास आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

७६. विशेष सहाय्य योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील वृध्द,निराधार,विधवा, व अपंग या घटकांना संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली अर्थसहाय्य देण्यात येते. त्यासाठी सन २०१७-१८ या वर्षासाठी १ हजार ८८४ कोटी ९९ लाख रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

**आदिवासी उपयोजना**

७७. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजना कार्यक्रमासाठी ६ हजार ७५४ कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे. याअंतर्गत इंदिरा आवास योजना व शबरी आदिवासी घरकुल योजनेसाठी एकत्रित ४२४ कोटी ६९ लाख रुपये, रस्ते विकास करिता ४४८ कोटी ०३ लाख रुपये, विद्युतीकरणासाठी १२८ कोटी ३५ लाख रुपये , सार्वजनिक आरोग्य करिता २६० कोटी ८७ लाख रुपये, सुवर्ण महोत्सवी शिष्यवृत्ती करिता १३७ कोटी ५८ लाख रुपये व भारत सरकार शिष्यवृत्ती करिता ८७ कोटी ५६ लाख रुपये नियतव्यय सन २०१७-१८ प्रस्तावित आहे.

७८. अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील युवकांमध्ये उद्योजकता निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून केंद्र शासनाने स्टॅण्डअप इंडिया योजना घोषित केली आहे. त्यामध्ये मार्जिनमनी देण्याचे शासनाने निश्चित केले असून, सन २०१७-१८ मध्ये यासाठी रु. २५ कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

७९. अनुसूचित जमाती क्षेत्रात कुपोषणामुळे कमी वजनाची बालके जन्मास येतात. त्यावर मात करणे तसेच महिला व बालकांच्या पोषणामध्ये वाढ करण्यासाठी गरोदर स्त्रिया, स्तनदा माता आणि ७ महिने ते ६ वर्ष वयोगटातील बालकांसाठी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम अमृत आहार योजना सुरु केलेली आहे. या योजनेची व्याप्ती आता वाढविण्यात आली असून याद्वारे गरोदर स्त्रिया व स्तनदा माता यांना आठवड्यातून ६ दिवस असे १५ महिने एक वेळ चौरस आहार देण्यात येत असून एकूण १ लाख १७ हजार महिलांना लाभ देण्यात येत आहे तर ७ लाख ६१ हजार बालकांना आठवड्यातून ४ दिवस अंडी / केळी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

८०. आदिवासी विकास महामंडळाकडून विविध योजनेंतर्गत दरवर्षी १२ लक्ष क्विंटल धान खरेदी करण्यात येतो. परंतु महामंडळाकडे पर्याप्त साठवणूक क्षमता नसल्यामुळे दरवर्षी मोठ्या प्रमाणावर शेतकऱ्यांच्या मालाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळामार्फत गडचिरोली, गोंदिया, नागपूर, पालघर व ठाणे या पाच जिल्ह्यांमध्ये अभिनव व शास्त्रोक्त पद्धतीने ५ लक्ष क्विंटल क्षमतेची ४९ गोदामे भाडे तत्वावर उपलब्ध करुन घेण्यात येतील. यासाठी संभाव्य निविदाधारकांकडून स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) मागविण्यात येईल.

**विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण**

८१. विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांच्या कल्याणासाठी व त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राज्य शासनाने विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग कल्याण हा स्वतंत्र विभाग दि. ०१ एप्रिल,२०१७ पासून स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. या विभागातील विविध कल्याणकारी योजना जसे शिक्षण, प्रशिक्षण, शिष्यवृत्ती, वसतीगृह आश्रमशाळा, अनुदान, आर्थिक सहाय्य या विभागासाठी सन २०१७-१८ मध्ये २ हजार ३८४ कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

८२. राज्यातील विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या समाजाच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक विकासावर प्रकर्षाने लक्ष देण्यासाठी, त्यांचे प्रश्न जाणून घेण्यासाठी. त्याबाबतचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी आणि त्यावर उपाययोजना सुचविण्यासाठी राज्यामध्ये “ राजर्षी शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) Rajarshi Shahu Maharaj Research, Training and Human Developement Institute (SARTHI) ” स्थापन करण्यात येईल.

८३. तसेच आर्थिकदृष्ट्या मागासवर्गाच्या सर्वांगीण विकासासाठी स्थापन केलेल्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळास २०० कोटी रुपये, इतर मागासवर्गीय विकास महामंडळास २०० कोटी रुपये आणि शामराव पेजे कोकण कुणबी विकास महामंडळास ५० कोटी रुपये भागभांडवलासाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

अल्पसंख्याक ८४. राज्यातील अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठी राबविण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय विविध योजनांसाठी सन २०१७-१८ मध्ये ३३२ कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित आहे.

८५. राज्यातील अल्पसंख्याक बहूल नागरी व ग्रामीण क्षेत्रात मूलभूत/ पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन, अल्पसंख्याक लोक समुहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचविण्यासाठी सन २०१७-१८ या वर्षात नागरी व ग्रामीण क्षेत्रासाठी १२५ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

८६. राज्यातील अल्पसंख्याक लोकसमुहातील उमेदवारांना शासकीय व निम शासकीय सेवेत रोजगाराच्या पुरेशा संधी उपलब्ध होण्यासाठी केंद्रीय लोकसेवा / महाराष्ट्र लोकसेवा आयोग / बँकिंग सेवा इत्यादी स्पर्धा परीक्षांसाठी प्रशिक्षण तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमामधील प्रवेशाकरिता घेण्यात येणाऱ्या सामायिक प्रवेश परीक्षांच्या पूर्वतयारीसाठी प्रशिक्षण देण्याकरिता विशेष शिकवणी वर्ग सुरु करण्यात आले आहेत. सन २०१७-१८ या वर्षात याकरिता ८ कोटी रुपये निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

८७. एकात्मिक बालविकास सेवा योजना राज्यात १९७५ पासून राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत वर्षानुवर्षे अंगणवाडीतील बालकांना देण्यात येणारा पोषण आहार एकसारखा असल्यामुळे या मुलांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. अंगणवाडीमधील सर्व बालकांना एकवेळचे जेवण व अल्पोपहार देणे अभिप्रेत आहे. याचा सखोल विचार करुन महाराष्ट्र शासनाने पुरोगामी व लोकाभिमुख निर्णय घेतलेला आहे. त्यानुसार आता दरदिवशी मुलांना वैविध्य जपणारे पोषक खाद्यपदार्थ दिले जातील. हा निर्णय लाखो मुलांचे पोषण व आरोग्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. यासाठी केंद्र पुरस्कृत पूरक पोषण आहार योजनेअंतर्गत ३१० कोटी ५७ लाख रुपये एवढी भरीव तरतूद करण्यात आलेली आहे.

महिला ८८. महिलांचे सक्षमीकरण तसेच महिलांच्या सन्मान व समानतेसाठी महिला आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. महिलांचे प्रश्न व अन्य तक्रारींचे निवारण व्हावे व त्यांच्यामध्ये जाणीव-जागृती व्हावी व महिला आयोगास सक्षमपणे काम करता यावे, यासाठी मागील तीन वर्षाच्या तुलनेत भरीव वाढ करुन ७ कोटी ९४ लाख रुपये इतका निधी उपलब्ध करण्यात आला आहे. आवश्यकतेनुसार अतिरिक्त निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

८९. विकासाची गंगा शेवटच्या माणसापर्यंत पोहचविणे हे स्वप्न उराशी बाळगून सादर केलेली दीन दयाळ अंत्योदय योजना उपेक्षित, वंचितांच्या जीवनात प्रकाश देणारी ठरली आहे. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबाच्या दारीद्र्य निर्मुलनासाठी व त्यांच्या संस्थाचे बळकटीकरणासाठी वर्ष २०१७-१८ मध्ये ५५ हजार ११८ महिला स्वयंसहाय्यता समूह स्थापन करण्याचे नियोजन असून त्यामध्ये ५ लाख, ६२ हजार, ०८५ कुटुंबांचा समावेश करण्यात येईल. २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरिता या योजनेकरिता रु. १३३.८४ कोटी एवढा निधी प्रस्तावित केला आहे.

**अस्मिता योजना**

९०. राज्यातील ग्रामीण भागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक तसेच जिल्हा परिषदेच्या शाळेतील किशोरवयीन विद्यार्थीनींना सॅनिटरी नॅपकिन सवलतीच्या दराने उपलब्ध करुन देण्यासाठी अस्मिता योजना सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

९१. राज्यातील गावांचा शाश्वत विकास घडवून आणण्यास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने दिनांक २१ नोव्हेंबर २०१६ पासून स्मार्ट ग्राम योजना सुरु करण्यात आली आहे. सदर योजना द्विस्तरीय असून तालुका स्तरावर तालुका स्मार्ट ग्राम व जिल्हा स्तरावर जिल्हा स्मार्ट ग्राम निवडण्यात येणार असून, त्यांना अनुक्रमे रु. १० लक्ष व रुपये ४० लक्ष इतकी रक्कम बक्षिस रुपाने देण्यात येणार आहे. त्याकरिता सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात ५३ कोटी ८० लाख रुपये इतका निधी प्रस्तावित केला आहे.

९२. सन २०२२ पर्यंत सर्वांसाठी घर हे केंद्र शासनाचे उद्दिष्ट आहे. हे उद्दिष्ट लक्षात घेवून राज्य शासनाने पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर अनुसूचित जाती व नवबौध्द या घटकांसाठी रमाई आवास योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणावर घरे बांधण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. ग्रामीण व शहरी भागात सन २०१७-१८ या वर्षात ५५,००० घरे बांधण्याचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रु. ८०० कोटीची तरतूद केली आहे. तसेच ज्या लाभार्थ्यांकडे घर बांधण्यासाठी स्वत:ची जमीन नाही त्यांना जमीन घेण्याकरिता पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेतंर्गत रु. ५०,००० अनुदान देण्याचाही निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी अनुसूचित जाती उपयोजनेतंर्गत रुपये ११० कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

९३. दिनांक २ ऑक्टोबर २०१४ पासून स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) ही केंद्र पुरस्कृत योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत १० जिल्हे, १०३ तालुके आणि १४ हजार ग्रामपंचायती हगणदारीमुक्त घोषीत करण्यात आल्या आहेत. तसेच, मार्च, २०१८ अखेरपर्यंत संपूर्ण महाराष्ट्र राज्य हगणदारी मुक्त करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात राज्य आणि जिल्हास्तरावरील योजनांमध्ये एकूण ५४५ कोटी ६६ लाख रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे.

९४. केंद्र पुरस्कृत प्रधान मंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षासाठी १ लाख ८८ हजार १५६ घरकुलांचे उद्दिष्ट प्रस्तावित असून एकूण १ लाख ५० हजार घरकुलांची बांधकामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे. या घरकुलांपैकी ५० टक्के घरकुले अनुसूचित जाती व जमातीसाठी आणि १५ टक्के घरकुले अल्पसंख्याकांसाठी आहेत. लाभार्थांना देण्यात येणारे अनुदान त्यांच्या बँक खात्यामध्ये इलेक्ट्रॉनिक पद्धतीने थेट जमा करण्यात येणार आहे. याचबरोबर अनुसूचित जातींकरिता रमाई योजनेंतर्गत आणि अनुसूचित जमातींकरिता शबरी योजनेंतर्गत घरकुलांचे बांधकाम करण्यात येत आहे. याकरिता राज्य हिस्सा म्हणून ३१४ कोटी रुपये निधी राखून ठेवण्यात आला आहे.

९५. मानव विकास निर्देशांकात सामाविष्ट असलेल्या एकूण १२५ तालुक्यांपैकी निवडक २५ तालुक्यात रोजगारनिर्मितीसाठी एक विशेष योजना राबविण्याचा शासनाचा मानस असून त्यामाध्यमातून हे तालुके रोजगारयुक्त तालुके करण्याचे शासनाने ठरविले आहे. यासाठी १०० कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

९६. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत नवीन गोदामांच्या बांधकामासाठी सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात ८० कोटी रुपये इतकी भरीव आर्थिक तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे. त्यामुळे शासकीय गोदामांची संख्या १ हजार २०० इतकी होईल व एकूण साठवणूक क्षमतेत वाढ होऊन अपेक्षित क्षमतेच्या दोन तृतीयांश इतकी साठवणूक क्षमता निर्माण होईल.

९७. "सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण" प्रकल्पाअंतर्गत राज्यातील ५२ हजार स्वस्त धान्य दुकानांमध्ये ePOS मशीन बसविण्यात येणार आहेत.

ePOS मुळे बायोमेट्रीक पद्धतीने लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप होऊन रोखरहीत (cashless) व्यवस्था निर्माण होणार आहे. शासनाच्या प्रदानासाठी GRAS सुविधेद्धारे चलन सुविधा सर्वत्र उपलब्ध करण्यात येत आहे.

**पर्यटन, सांस्कृतिक कार्य व थोर व्यक्तींची स्मारके**

९८. राज्यातील विविध पर्यटन स्थळांच्या ठिकाणी मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याकरिता सन २०१७-१८ मध्ये १७४ कोटी रुपये तरतूद प्रस्तावित केली आहे.

९९. सिंधुदुर्ग जिल्हा निर्मितीचे हे रौप्य महोत्सवी वर्ष आहे. त्याचे औचित्य साधून सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या विविध कामांसाठी एक विशेष निधी म्हणून २५ कोटी रुपये देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच सिंधुदूर्ग हा पर्यटन जिल्हा असल्याने पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी तिल्लारी पाणीपूरवठा योजना कार्यान्वित करण्यासाठी सन २०१७-१८ मध्ये १०० कोटी निधी प्रस्तावित करण्यात येत आहे. तसेच कोकणातील पर्यटनाचा सर्वांगीण विकास व्हावा म्हणून स्वतंत्र कंपनीची स्थापना करण्यात येईल.

१००. नांदेड जिल्ह्यातील श्री क्षेत्र माहूरगड, कोल्हापूर जिल्ह्यातील ज्योतीबाचा डोंगर, किल्ले रायगड, किल्ले सिंधुदुर्ग आणि लोणार सरोवर या स्थळांचा विकास करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

१०१. महाराष्ट्राचे मानबिंदू असणाऱ्या थोर व्यक्तींच्या स्मृती जागृत ठेवण्यासाठी शासन सातत्याने प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणूनच आमच्या श्रद्धास्थानांची स्मारके आम्ही आदराने उभारीत आहोत. मुंबई लगतच्या अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक, कोल्हापूर येथे राजर्षी शाहू महाराज स्मारक, इंदू मिल, दादर, मुंबई येथील भारतरत्न महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक आणि श्रद्धेय श्री. बाळासाहेब ठाकरे यांचे महापौर बंगल्यातील स्मारक या विविध स्मारकांसाठी २०० कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित करण्यात आला असून यासाठी आवश्यकतेनुसार निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

१०२. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीला सन २०१९ मध्ये १५० वर्षे तसेच सेवाग्राम येथील त्यांच्या वास्तव्याला ७५ वर्षे पूर्ण होत आहेत. याप्रसंगांचे औचित्य साधून सेवाग्राम परिसराचा सर्वसमावेशक विकास करण्याच्या दृष्टीने २६६ कोटी ५३ लाख रुपयांचा सेवाग्राम विकास आराखडा प्रस्तावित असून त्यापैकी मागील आर्थिक वर्षात २५ कोटी रुपयांचा निधी वितरित केला आहे. आता सन २०१७-१८ मध्ये यासाठी ९३ कोटी ८० लाख रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

१०३. पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांचे यथोचित स्मारकाचे बांधकाम त्यांचे जन्मगावी चोंडी, ता. जामखेड, जि. अहमदनगर येथे प्रगतीपथावर आहे. याकरिता आवश्यकते प्रमाणे निधी उपलब्ध करुन दिला जाईल.

१०४. महाराष्ट्रातील संतांनी विठ्ठलाच्या पायावर लीन होत भक्तीच्या क्षेत्रात समतेचा झेंडा रोवला. समतेची ही दिंडी महाराष्ट्रीय जनजीवनात बंधूभाव आणि जिव्हाळा रुजवित राहिली. या परंपरेने महाराष्ट्राला संस्कृतीचा महान वारसा दिला आणि एकोप्याने जगण्याची दृष्टी दिली. वारकरी संप्रदायाची ही प्राचीन परंपरा जपत राज्यभरातून आषाढी एकादशीसाठी दिंड्या पंढरपूरास येतात. गेल्या वर्षी वारकऱ्यांच्या सोयीसाठी तात्पुरती स्वच्छतागृहे उपलब्ध करुन देण्यासाठी दोन कोटी रुपये इतकी अतिरिक्त मदत देण्यात आली होती. या उपक्रमास चांगला प्रतिसाद मिळाला असल्यामुळे सन २०१७-१८ पासून तीन कोटी रुपये एवढी मदत प्रतिवर्षी देण्यात येईल.

१०५. रंगभूमीविषयक नव्या संकल्पना आणि प्रयोगांना वाव मिळण्यासाठी नॅशनल स्कूल ऑफ ड्रामा (एन.एस.डी.) च्या धर्तीवर मुंबईच्या चित्रनगरीमध्ये महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामा सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे.

**मराठी भाषा विकास**

१०६. ग्रंथ चळवळ ही कोणत्याही भाषेच्या प्रगतीचा आधार असते. मराठीच्या वैभवासाठी मराठी ग्रंथ चळवळ करीत असलेले कार्य प्रशंसनीय आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी सन २०१६-१७ मध्ये कार्यान्वित केलेल्या विविध प्रकल्पांसह भारतातील ग्रंथालय चळवळीचा समग्र इतिहास या प्रकल्पाचे काम यामधून होणार आहे. मराठी भाषा विभागाकरीता सन २०१७-१८ मध्ये एकूण १७ कोटी ३२ लाख रुपये तरतूद प्रस्तावित करण्यात आली आहे.

**सुप्रशासन**

प्रशासन आणि जनता यात सुसंवाद असावा असे नेहमीच म्हटले जाते. स्वच्छ आणि पारदर्शी प्रशासन हा या सुसंवादाचा आधार असतो. या सोबतच प्रशासन गतीमान आणि कार्यक्षम असावे ही जनतेची अपेक्षा असते. प्रशासनावरील विश्वासाने लोकसहभागाची प्रक्रिया घडत असते. या प्रक्रियेला ई-प्रशासनाची जोड देत ती अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यावर आमचा भर आहे. पारदर्शी प्रशासनाचे महत्त्व अधोरेखीत व्हावे यासाठी हे सरकार वचनबद्ध आहे. यासाठी मी खालील योजना जाहीर करतो.

१०७. शासकीय कामकाजात संगणकाचा तसेच ई-प्रशासनाचा वापर करुन कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी माहिती तंत्रज्ञान संचालनालयास मागील वर्षाच्या ८ कोटी रुपयांच्या तुलनेत यावर्षी २०० कोटी रुपये नियतव्यय देण्यात आला असून त्याद्वारे स्टेट डेटा सेंटर अपग्रेडेशन करणे, डीबीटी पोर्टल सुरु करणे, नागपूर स्मार्ट आणि सेफ सिटी प्रकल्प, पॅन स्टेट ई प्रोक्युरमेंट पोर्टल, पॅन स्टेट ई-एक्झामिन पोर्टल, महाराष्ट्र अर्बन जीओ पोर्टल आणि अर्बन गव्हर्नन्स फ्रेमवर्क, सायबर सिक्युरीटी, युनिव्हर्सिटी मॅनेजमेंट सिस्टीम आणि टेक्निकल मॅन पॉवर इत्यादी प्रकल्प राबविले जाणार आहेत.

१०८. डिसेंबर, २०१८ पर्यंत केंद्र शासनाच्या सहाय्याने भारत नेट कार्यक्रमांतर्गत सर्व २८ हजार ३३२ ग्रामपंचायती ऑप्टीकल फायबर रिंग आर्किटेक्चर फ्रेमवर्कने जोडून राज्यात दळणवळणाची नाविन्यपूर्ण पायाभूत सुविधा स्थापित करण्याची शासनाने महत्वकांक्षी योजना आखली आहे. या प्रकल्पाअंतर्गत दिनांक २ ऑक्टोबर २०१६ रोजी नागपूर जिल्हा प्रथम "डिजिटल जिल्हा" म्हणून घोषित झाला आहे.

१०९. शासनाने महाराष्ट्र आधार (वित्तीय व इतर अर्थसहाय्य, लाभ आणि सेवा यांचे लक्षित वितरण) अधिनियम, २०१६ पारित केला असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे. या कायद्याच्या आधारे सध्या राज्य शासनाकडून विविध योजनांतर्गत पात्र लाभार्थ्यांना देण्यात येणारे वस्तू व रोख रकमेच्या स्वरुपातील सर्व प्रकारचे लाभ हे आता थेट लाभार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात जमा करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. यामध्ये विशेषत्वाने विविध व्यवसायीक अभ्यासक्रमांना प्रवेश घेणाऱ्या सामाजिक व आर्थिक

दृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना प्रचलित शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत शिक्षण शुल्कापोटी शैक्षणिक संस्थांना देण्यात येणारे प्रतिपूर्तीची रक्कम आता थेट पात्र लाभार्थी विद्यार्थ्यांच्या आधार संलग्नित बँक खात्यात शासनाकडून जमा करण्यात येईल. जेणेकरुन या योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे व पारदर्शक पद्धतीने करणे शक्य होणार आहे. केंद्र शासनाने राबवलेल्या अशाप्रकारच्या योजनेमुळे केंद्र शासनाचे जवळपास ३६ हजार ५०० कोटी रुपयांची बचत झाल्याचेही निदर्शनास आले आहे. सद्यस्थितीत या योजनेमधून एकूण ६२ वस्तूंच्या संदर्भात वस्तू ऐवजी थेट अनुदान जमा करण्याचे निश्चित केले आहे.

११०. आपल्या प्राणाची बाजी लावून राज्यातील जनतेला सुरक्षित ठेवण्यात महाराष्ट्रातील पोलीसदलाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. मला सांगण्यास आनंद होतो की, मागील अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला मुंबई शहरातील सीसीटिव्ही प्रकल्प कार्यान्वित करण्यात आला आहे. तसेच राज्य पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाचा एक भाग म्हणून नाशिक व कल्याण-डोंबिवली या महानगरपालिका क्षेत्रात सीसीटिव्ही प्रकल्पास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच नवी मुंबई, मीरा-भाईंदर, अमरावती, अकोला व चंद्रपूर या शहरात सीसीटिव्ही प्रकल्प राबविण्याचे प्रस्तावित आहे.

१११. ठाणे, रत्नागिरी, सोलापूर, धुळे व चंद्रपूर या पाच जिल्ह्यांमध्ये गुन्हा सिद्ध होण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी न्यायवैज्ञानिक लघु प्रयोग शाळा सुरु करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

११२. तसेच आपात्कालीन परिस्थितीत पोलीस सेवा तात्काळ उपलब्ध व्हावी या दृष्टीकोनातून डायल ११२ हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे या सेवेअंतर्गत पोलीस, अग्नीशमन आणि रुग्णवाहिका या तीनही सेवांचा समावेश करण्यात येणार आहे.

११३. राज्याचा अंगुलीमुद्रा परिक्षण विभागाचे (फिंगर प्रिंट ब्यूरो) पूर्णपणे संगणकीकरण करण्याचा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. तसेच राज्यात ई-चलन प्रकल्प हाती घेण्यात येत आहे.

पोलीस दल आधुनिकिकरणाच्या वरील योजनांसाठी सन २०१७-१८ मध्ये एकूण १४१ कोटी निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

११४. पोलीस दलातील कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी राज्य शासन विविध योजना राबवित आहे. पोलीस गृहनिर्माणाकरिता सन २०१७-१८ मध्ये एकूण ३२५ कोटी रुपये निधी प्रस्तावित करण्यात आला आहे.

११५. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी ६ राज्य लोकसेवा हक्क आयुक्त व महाराष्ट्र लोकसेवा हक्क आयोग मुख्यालय अशी ७ कार्यालये गठित करण्यात आली आहेत. सन २०१७-१८ मध्ये यासाठी १२ कोटी रुपये इतक्या निधीची तरतूद करण्यात आली आहे.

११६. महाराष्ट्र हे एक न्यायप्रिय व कायदे पालन करणारे राज्य असून न्याय यंत्रणेच्या सक्षमीकरणातही राज्य अग्रेसर आहे. राज्यात न्यायाधीशांची संख्या २ हजार १६८ एवढी असून ती देशात सर्वाधिक आहे. न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा जलद निपटारा करुन दोष सिद्धीचे प्रमाण वाढविल्यास समाजात कायदा व सुव्यवस्थेची स्थिती निर्माण करण्यास व सामान्य जनतेच्या मनात कायद्याबाबत आदर निर्माण होण्यास मदत होईल. यासंदर्भात मागील दोन वर्षांच्या कालावधीत शासन दोषसिद्धीचे प्रमाण वाढविण्यात यशस्वी ठरले असून जानेवारी २०१७ अखेर दोष सिद्धीचे प्रमाण ५८.८७ टक्के एवढे वाढले आहे. यामध्ये अजून सुधारणा करण्यासाठी नजिकच्या काळात एकूण १ हजार १४ कोटी रुपये एवढा अधिकचा निधी उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. या माध्यमातून राज्यात अतिरिक्त न्यायालये, जलदगती न्यायालये आणि कौटुंबिक न्यायालये सुरु करण्याचे नियोजन आहे. त्याचप्रमाणे न्यायालयीन व्यवस्थेचे संगणकीकरण, न्यायालयीन संकुले व न्यायालयीन इमारतींची बांधकामे सुरु असून न्याय यंत्रणेचे सक्षमिकरण व बांधकामे यासाठी सन २०१४-१५ च्या ४१३ कोटी ६० लाख रुपयांच्या तुलनेत सन २०१७-१८ मध्ये ६७९ कोटी ५३ लाख रुपये एवढा भरीव निधी प्रस्तावित आहे.

११७. राज्यातील जमीनींचे एकूण सुमारे ९५ लाख ७५ हजार मोजणी नकाशे आणि सुमारे ४ कोटी ८० लाख पॉलीगॉन्सचे डिजीटायझेशन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्याअनुषंगाने राज्यातील ६ जिल्ह्यातील अंदाजे २४ लाख ७६ हजार मोजणी नकाशे आणि १ कोटी ३६ लाख पॉलीगॉन्सचे डिजीटायझेशन प्रथम टप्प्यात सन २०१७-१८ मध्ये पूर्ण करण्याचे संकल्पीत आहे. तसेच राज्याच्या ग्रामीण भागातील जमिनीची पुर्नमोजणी करण्याचा निर्णय घेण्यात

आला असून त्या अनुषंगाने प्रथम टप्प्यात राज्यात ६ जिल्ह्यातील जमिनीची पुर्नमोजणी सन २०१७-१८ मध्ये सुरु करुन ३ वर्षांत पूर्ण करण्याचे नियोजित आहे. या दोन्ही बाबींसाठी सन २०१७-१८ मध्ये ४७ कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

११८. महसूल विभाग हा राज्य शासनातील महत्त्वाचा प्रशासकीय विभाग आहे. महसूल यंत्रणेचे विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि तहसील कार्यालये या इमारतींच्या बांधकामासाठी सन २०१७-१८ मध्ये १०४ कोटी रुपये निधी प्रस्तावित आहे.

११९. शासकीय इमारतींसाठी शासनाचा बराचसा निधी गुंतून राहतो. तसेच सदर इमारतींच्या देखभाल व दुरुस्तींसाठी शासनाचा निधी व मनुष्यबळ खर्ची पडते. यापुढे शासकीय प्रयोजनासाठीच्या इमारती २५ वर्षांच्या भाडेतत्वावर वापरावयास घेणे या संबंधीचे धोरण ठरविण्यासाठी एक उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात येईल. यामुळे शासनाचा निधी अधिक महत्वाच्या लोकोपयोगी विकासकामासाठी वापरणे शक्य होईल.

१२०. राज्यातील परीवहन कार्यालयांचे कामकाज जलद गतीने करण्यासाठी अभिलेखांचे संगणकीकरण करण्यासाठी ३३ कोटी ६६ लाख रुपये निधी देण्यात येत आहे.

१२१. रस्ते अपघातामुळे अपघातग्रस्त व्यक्तीच्या कुटुंबावर होणारा आघात लक्षात घेता, रस्ते अपघात टाळणे आवश्यक आहे. त्यासाठी उपयुक्त ती रस्ते सुरक्षा विषयक उपाययोजना करण्यासाठी मोटार वाहन विभागास यांत्रिक उपकरणे पुरविण्याकरिता ३४कोटी ८६ लाख रूपये निधी देण्यात येत आहे.

१२२. केंद्र शासनाने सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या अनुषंगाने आदेश निर्गमित करुन, केंद्र शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित वेतनश्रेणी विहित केल्या आहेत. या सुधारित वेतनश्रेणी राज्य शासकीय कर्मचारी व इतर पात्र कर्मचाऱ्यांना देखील परिक्षणांती लागू करण्यासाठी सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींच्या सखोल अभ्यास करण्यासाठी व शिफारशी करण्यासाठी राज्य वेतन सुधारणा समिती, २०१७ स्थापन करण्यात आली आहे. राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करण्यासाठी आवश्यक तरतूद योग्य वेळी करण्यात येईल.

**अर्थसंकल्प कार्यपद्धतीतील बदल**

१२३. प्रशासकीय सुधारणा आयोग (Administrative Reforms Commission) व डॉ. रंगराजन यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय तज्ञ समिती (High Level Expert Committee) तसेच १२ व्या वित्त आयोगाने अर्थसंकल्पातील योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याची शिफारस केलेली आहे. नियोजन आयोगाचे राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था (निती आयोग) यामध्ये रुपांतर झाले आहे. आणि १२ व्या पंचवार्षिक योजना दिनांक ३१ मार्च २०१७ रोजी संपुष्टात येत आहे. या बाबी लक्षात घेऊन केंद्र शासनाने सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्रात देखिल आम्ही सन २०१७-१८ या आर्थिक वर्षापासून योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण करण्याचा निर्णय घेतला आहे. यानिर्णयामुळे राज्यशासनाला आता भांडवली खर्चावर लक्ष केंद्रित करता येईल. जरी योजनांतर्गत तरतूद केवळ एकत्रित अर्थसंकल्पाच्या २५ टक्के इतकीच असली तरी सध्या फक्त या योजनांतर्गत तरतूदीकडेच लक्ष देण्यात येते. मात्र या बदलामुळे आता प्रत्येक विभागास त्यांना प्राप्त झालेली तरतूद उपयोगात आणण्याची लवचिकता प्राप्त होईल. तसेच विभागाला ६० वर्षांत निर्माण झालेल्या मालमत्तांची देखभाल करण्याकडे यापुर्वी लक्ष देता आले नव्हते ते आता शक्य होईल व त्यासाठी विभागाला आता पुरेशी तरतूद सिमांकित करता येईल.

हे बदल करतांना मी सदनाला आश्वासित करु इच्छितो की, या एकत्रीकरणामुळे अनुसूचित जाती घटक कार्यक्रम व आदिवासी घटक कार्यक्रम यांच्याकरिता सन २०१६-१७ साठी योजनांतर्गत व योजनेतर मधून प्राप्त झालेला निधी मूळ आश्वासित निधी (Base Commitment) म्हणून निश्चित करण्यात आला असून या आश्वासित निधीपेक्षा उक्त घटक कार्यक्रमांना सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात अर्थसंकल्पीय तरतूद कमी असणार नाही.

योजनांतर्गत व योजनेतर खर्चाचे एकत्रिकरण हा महत्त्वाचा मोठा बदल असून देशात पंचवार्षिक योजना राबविण्यास सुरुवात केल्यापासूनच्या प्रचलित आर्थिक

व्यवस्थेमध्ये ही परीवर्तनाची सुरुवात आहे. या सुधारणा राबविताना भविष्यातील अनुभव व गरजांनुसार आवश्यक ते बदल व सुधारणा टप्प्याटप्प्याने करण्यात येतील.

अनूसूचित जाती उप योजना व आदिवासी उप योजनेखालील जिल्हा वार्षिक योजनेच्या निधीचा वेळेवर वापर शक्य व्हावा यासाठी राज्यस्तराऐवजी जिल्हा स्तरावर निधीचे पुनर्विनियोजनाचे अधिकार प्रदान करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

**स्थूल आर्थिक आढावा व राज्याचे उत्पन्न**

१२४. प्रचलित किंमतीनुसार २०१५-१६ मध्ये राज्याचे नाममात्र निव्वळ उत्पन्न १७ लाख ४८ हजार ७७१ कोटी रुपये आहे. महाराष्ट्राचे अंदाजीत दरडोई उत्पन्न सन २०१५-१६ मध्ये १ लाख ४७ हजार ३९९ रुपये इतके आहे, तर अंदाजीत दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ९४ हजार १७८ रुपये इतके आहे.

**वार्षिक योजना सन २०१७-१८**

१२५. २०१७-१८ मध्ये नविन पद्धतीनुसार जरी कार्यक्रम खर्चाची रक्कम ७७ हजार १८४ कोटी रुपये असली तरी सन २०१६-१७ च्या योजनांतर्गत ५६ हजार ९९७ कोटी रुपयांच्या तुलनेत यावर्षी ६२ हजार ८४४ कोटी रुपये इतकी तरतूद करण्यात आली आहे. मी येथे नमूद करु इच्छितो की, गतवर्षीच्या योजनांतर्गत तरतुदीच्या तुलनेत तरतुदीमध्ये सुमारे १०.२५ टक्के वाढ करण्यात आली आहे.

**राज्याची वित्तीय स्थिती**

१२६. मार्च, २०१६ मध्ये अर्थसंकल्प सादर केला असतांना २ लाख २० हजार ८१० कोटी रुपये महसुली जमा अपेक्षित केली होती. वर्षभरातील महसूल संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाज २ लाख २० हजार ०११ कोटी रुपये एवढा निश्चित केला आहे. सन २०१७-१८ च्या अर्थसंकल्पामध्ये महसूली जमा २ लाख ४३ हजार ७३७ कोटी रुपये व महसूली खर्च २ लाख ४८ हजार २४८ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी, ४हजार ५११ कोटी रुपये

महसूली तुट येत आहे. अनावश्यक खर्चात बचत करुन व महसूल वसुली अधिक प्रभावीपणे करुन ही तुट मर्यादित करण्याचा प्रयत्न मी करेन. या राज्याच्या विकासाचा संकल्प करतांना जे उद्दिष्ट आम्ही निश्चित केले आहे, त्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्टा करु, अशी ग्वाही या पवित्र सभागृहाच्या साक्षीने राज्यातील जनतेला देत आहे.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग दोन कडे वळतो.